# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- दिनांक.२३.०३.२०२०

वाचाः- या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २२.०३.२०२०.

**विषयः-** अत्यावश्यक/जीवनावश्यक/उत्पादनाचे कंपन्या/ कारखाने/ उद्योग/व्यवसाय चालू ठेवणेबाबत.

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भीय आदेशान्वये दिनांक.२२ मार्च २०२० रोजी सकाळी ०५.०० वा. पासून ते दि.३१.०३.२०२० चे २४.०० वा. पर्यंत नागरी भागात (महानगर पालीका, नगर परीषद व नगर पंचायत) राहण्या-या नागरी भागात जमावबंदी आदेश लागू करीत असून या कालावधीत (५) पाच व त्या पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास प्रतिबंध निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच, मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी, मी डॉ. विपीन इटनकर, भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी नांदेड, जिल्हयातील सर्व उद्योग, कारखाने, कंपणी व तत्सम आस्थापना आदेशाच्या दिनांकापासून दि.३१.०३.२०२० पावेतो खालील आस्थापना वगळून पुर्णपणे बंद करणेबाबत आदेशित करीता आहे.

**वगळण्यात आलेली कंपन्या/कारखाने /उद्योग/व्यवसाय.**

१) औषध निर्माण करणा-या तसेच, वैद्यकीय सेवा करीता पुरविण्यात येणा-या साहीत्यांची निर्मिती करणारे

२) सॅनिटायझर, साबन, जंतुनाशके, हॅन्डवॉश निर्माण करणारे.

३) कृषी उत्पन्नावर प्रक्रिया करणारे

४) अत्यावश्यक सेवा व वस्तु पुरविणारे.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.**
पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
४) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) पोलीस अधीक्षक, नांदेड
६) जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड
७) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
८) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सहायक कामगार आयुक्त, नांदेड
११) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अधिकारी, एम.आय.डी.सी.,नांदेड
१२) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपंचायत, जि.नांदेड

जिल्हादंडाधिकारी, नांदेड